I J R S S I S, Vol. V (1), Jan 2017: 130-131 ISSN 2347 – 8268

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No. MH-659/13(N)
www.vmsindia.org

# मसाई पठार पर्यटन स्थंळाचा भौगोलिक अभ्यास

घोलप विशाल सर्जेराव

भूगोल अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रस्तावना –

आज पयर्टन हा जगातील सर्वात मोठा आणि वेगाने विकसित होणारा व्यवसाय आहे. जगामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने नैसर्गिक सौंदर्य लाभलेल्या ठिकाणासोबत सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेली ठिकाणे देखील पर्यटकांना आकर्षक होत आहेत. भारत देश हा प्राचीन काळापासुन ऐतिहासिक व सांस्कृतिक गोष्टीचा ठेवा जपणारा एक महत्वाचा देश आहेभारतात अनेक ऐतिहासिक स्थाने व काळया दगडामध्ये कोरलेली लेणी वशिल्पस्थाने यांच्या रूपाने आपल्या प्राचीन संस्कृतीचा वारसा जपुन ठेवलेल्या आहेत. तसेच धार्मिक तिर्थक्षेत्रे ऐतिहासिक वास्तु आणि मुक्तहस्ताने उधाळलेला निसर्ग ही भारतीय पर्यटन क्षेत्राची प्रमुख ओळख आहे म्हणुन अभ्यास क्षेत्र म्हणुन कोल्हापुर जिल्हयातील मसाई पठार हे नैसर्गिक रम्य स्थान घेतले आहे. कोल्हापूर जिल्हा हा जैविक विविधतेच्या दृष्टीने व वनस्पती, प्राणी यांनी संपन्न आहे. त्यामध्ये ब्रम्हगीरी, पन्नगालय, पर्नालदुर्ग, पन्हाळा गड अशा विविध नावांनी ओळखणारा पन्हाळा ऐतिहासिक, आध्यात्मिक व थंड हवेचे ठिकाण म्हणुन ओळखला जातोपण जेवढा पन्हाळा गडाचा विकास झाला तेवढा त्याच्या शेजारील पश्चिमेस मसाई पठाराचा विकास झालेला दिसून येत नाही म्हणून सदर संशोधन निबंधामध्ये मसाई पठार स्थंळाचा विकास पुर्ण व्हावा या पर्यटन स्थळाची माहिती सर्वसामान्यास व्हावी म्हणुन कोल्हापूर जिल्हयातील मसाई पठार या दुर्लक्षित पर्यटन क्षेत्राचा अभ्यास सदर शोध निबंधातून केलेला दिसुन येतो.

• बीज संज्ञा–

पर्यटन, दुर्लक्षित प्राचीन पठार आणि मसाई पठार पर्यटन केंद्र विकासाच्या उपाययोजना.

• अभ्यास क्षेत्र –

मसाई पठार हे ठिकाण महाराष्ट्र राज्यामध्ये कोल्हापूर जिल्हयात पन्हाळा डोंगर रांगेवर आहे. कोल्हापूर शहराच्या वायव्येस 20 किलो मीटर अंतरावर, पन्हाळा गडच्या पश्चिमेस 3 किलो मीटर अंतरावर मसाई पठार हे ठिकाण आहे. मसाई पठाराचे अक्षवृत्तीय स्थान 16 अंश 48 मिनिट, उत्तर असुन रेखावृत्तीय स्थान 74 अंश 08 मिनिट पुर्व रेखांश आहे. मसाई पठाराचे दक्षिणेस इंजोळे, दळवीवाडी, बांदिवडे, माणकात्रेवाडी, खडे खोळवाडी तर पुर्वेस पन्हाळ गड, म्हाळुंगेगाव त्यांचप्रमाणे पश्चिमेस शाहुवाडी तालुक्यांतील पन्हाळा डोंगररांगा तर उत्तरेस हणमंतवाडी, केकतवाडी, मराठवाडी, बोंगेवाडी, जेहुर, बांधेवाडी ही गाव आहेत. तसेच मसाई पठाराचे क्षेत्रफळ एकुण 913 एकर असुन त्याची समुद्र सपाटीपासुनची उंची 900 मीटर आहेतसेच हे पठार एकुण नऊ पठारांनी तयार झालेले आहे. त्याचे पुर्व पश्चिम अंतर सुमारे 4 किलोमीटर आहे. तेथील सरासरी तापमान कमाल 34.4 तर किमान 20 अंश सेल्सियस आहे. तेथे पाऊस सरासरी 75 ते 80 इंचापर्यंत पडतो.

• अभ्यास पध्दत–

सदर संशोधन निबंधाच्या अभ्यासासाठी प्राथमिक माहिती ही प्रत्यक्ष निरीक्षण, तेथील स्थानिक लोकांच्या मुलाखती या सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे. तसेच द्वितीय माहिती मसाई पठार विकास मंडळ, संदर्भ ग्रंथ, इतर संशोधन निबंध, वृत्तपत्रे, इंटरनेट इ.च्या माध्यमातून ही माहिती मिळविलेली दिसुन येते.

• मसाई पठार –

महाराष्ट्र राज्यातील कोल्हापुर जिल्हयातील मसाई पठार हे विदीर्ण पठाराचे उदाहरण आहे. विदीर्ण पठाराचे हे जांभ्या खडकाचे असून ते पठार पुर्णपणे सपाट आहे. या पठाराचे वैशिष्टये म्हणजे महाबळेश्वर जवळील पाचगणी टेबललॅण्ड पेक्षा 10 पट्टीने मोठे आहे. तसेच या पठारावर मसाई देवीचे मंदिर असुन (मसाई.म्हसा. आई,महिषासुर्ला मारणारी,वधणारी आई) या देवीच्या नावांवरून मसाई पठार हा श्शब्द नावांरूपाला आला. तसेच या ठिकाणी दसऱ्याच्या निमित्ताने मोठी यात्रा साजरी केली जाते. मसाई देवीचे मंदिर 32 फुट लांब असुन 16 फुट रूंद आहे. तसेच या पठाराची पुर्व–पश्चिम लांबी 4

किलोमीटर असुन 20 ते 800 फुट रूंद अशा प्रमुख नऊ पठाराने व लहान तीन पठाराने मसाई पठाराची निर्मिती झालेली आहे. (प्रमुख नऊ पठारे – मंकीनोज पठार, बामणदरा पठार, आईसाहेब महाराज पठार, त्रिमुखी पठार, सुळका पठार, धाकटी पठार, पिराचे पठार, महमुदीन पिरजादे पठार आणि मसाई पठार) तसेच मसाई पठाराचे सभोवती अठरा दऱ्या व खोरी आहेत. यातील काही दऱ्यामधुन बारामाही वाहणारे पाण्याचे झरे आहेतमसाई पठाराच्या कडा या जांभ्या दगडाच्या असुन त्या 200 ते 600 फुट खोल आहेत. या खडकामध्ये एकुण 34–35 गुहा आहेत. पैकी मसाई मंदिराच्या उत्तरेस पांडवलेणी गुहा म्हणुन प्रसिध्द आहे. तसेच या लेण्यामध्ये गुहा, आठ निवासस्थाने, चैत्यगृह व पाठशाळा यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे या लेण्या बौध्द कालीन असुन येथे धार्मिक शिक्षण दिले जात असावे. कारण अशीच स्थिती क्षेत्र जोतिबा डोंगराचे पुर्वेस पोहाळे येथील समकालीन लेण्यामध्ये आहे. परंतू सध्या या मसाई लेण्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केलेले दिसून येते. तसेच मसाई मंदिराखाली जाणारा दोन किलो मीटर लांबीचा भुयारी मार्ग आजही अस्तित्वात आहे. हा एकमुखी भुयारी मार्ग एकुण पाच गुहांचा असुन त्याला चकवा गुहा म्हणुनही ओळखले जातेमसाई पठारावर अनेक नैसर्गिक तलाव आहेत. यापैकी ' ईश्वर म्हादु तळे' हे मोठे प्रसिध्द असुन यामध्ये वर्षेभर पाणीसाठा असतो. तसेच या पठारावर पावसाळयात लाल, निळी, केसरी अशी विविध रंगाची फुले येतात. छत्रपती शाहु महाराजांचे काळात येथे चहाची पिके घेतली जात असे. हा चहा इंग्लंडमध्ये 'पन्हाळा फोर्ट टी' म्हणुन त्याकाळी प्रसिध्द होताप्राचीन काळी व्यापारी मार्ग म्हणून राजापुर–घोडमाळ–घोडखिंड–मसाई पठार–पन्हाळा हा मार्ग होता.

- उपाययोजना–

पन्हाळा तालुक्यातील काही हौशी भुगोल, इतिहास व पर्यावरण प्रेमी तरूणांनी मसाई पठार या ऐतिहासिक, धार्मिक, निसर्गरम्य ठिकाणाचा पर्यटन केंद्र म्हणून विकास व्हावाम्हणून त्यांनी 'मसाई पठार विकास मंडळ' व इतर संस्था स्थापन करून तेथील विकासाचा कार्यभाग साधला. या मसाई पठार प्रेमी तरूणामुळे तेथे रस्त्याची सुविधा झाली. तसेच विविध प्रकारची वाहने ही मंदीरापर्यंत रस्त्यामुळे नेता आली. मसाई पठारावरून अनेक डोंगर रांगा अगदी आकर्षित करून घेतात. तसेच कासारी नदी व वारणा नदीचे दृश्य हे अप्रतिम असलेले दिसुन येते. तसेच विविध पर्यटक येथे भेटी देतात म्हणुन तेथील माहिती देण्याचे काम हे मसाई पठार विकास मंडळ करते.

- निष्कर्ष –

1) शासनाने व मसाई पठार विकास मंडळ यांनी तेथे पर्यटकनांसाठी मसाई पठार पाहण्यासाठी वेळ निश्चित करून दयावी.

2) मसाई पठारावर वाहनतळे करून वाहन नेहणेस बंदी घालावी व पर्यटकाने चालत किंवा घोडयावर बसुन पठार पाहावे की, जेणेकरून तेथील स्थानिक लोकांना रोजगार मिळेल.

3) पठारावर छोटे बंगले बांधल्यास शांत ठिकाणी राहणेसाठी पर्यटक येतील व एक स्वास्थ केंद्र म्हणुन या ठिकाणाचा विकास होईल.

4) मसाई पठार हे या विकास मंडळाने स्वच्छ ठेवावे त्यामुळे पर्यटकांना ते अधिक आकर्षित वाटेल.

- संदर्भ –


1) खतीब के.ए.: पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन

2) शिंदे एस.बी.: पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन

3) श्री. रमेश पाटील, जमीर गारदीः सफर पन्हाळ गड परिसराची, जी.पी. पब्लिकेशन, पन्हाळा
4) डॉ. प्रा.अरूण पाटील, प्रा. नामदेव आडनाईक : कोल्हापूर जिल्हयातील मसाई पठार 6)भौगोलिक अभ्यास

5) www.masaipatharwikipedia.com

6) Location Map, Sagar Chougule , Geoinformetics Diploma, Department of Geography, Shivaji University , Kolhapur.